* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

## *जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनात गुटख्याविरुध्द स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांची धडक कार्यवाही.*

जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांनी अवैध धंदयाविरुध्द उघडलेल्या विशेष मोहिमे अंर्तगत जिल्हा पोलीस अधिक्षक यांना मिळालेल्या माहिती वरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांचे पथकाने सौदागर पुरा वाशिम येथील किरणा दुकानदार महेश सुखदेव शर्मा याचे ताब्यातुन ४४५५०/- रु चा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत गुटखा जप्त केला आहे.

दिनांक २५/०५/२०१९ रोजी रात्री ०९.३० वा. जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांना मिळालेल्या माहितीवरून पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे यांचे मार्गदर्शनात त्यांचे पथकाने पोस्टे वाशिम शहर अंतर्गत सौदारगरपुरा येथील महेश शर्मा याचे घराची पंचासमक्ष छापा मारला असता त्यामध्ये महाराष्ट्र राज्यात शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा ज्यामध्ये नजर, विमल, सागर, हॉट, पान बहार अशा वेगवळया कंपन्यांचा असा एकुण ४४५५०/- रु चा गुटखा जप्त करुन ताब्यात घेण्यात आला आहे. सदर प्रकरण जप्त मालासह पुढील कार्यवाहीसाठी अन्न प्रशासन विभाग अकोला यांचे क्डे पुढील कार्यावाहीसाठी सोपविण्यात आले आहे.

सदर ची कामगीरी जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे, पोलीस उप निरीक्षक भगवान पायघन, पोहेकॉ/नंदकिशोर नंदकुले, पोकॉ/राम नागुलकर, संतोष शेणकुडे, किशोर खंडारे अमोल एकाडे, संगिता शिंदे यांनी केली आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक वाशिम यांनी अवैध गुटखा तस्करी विरूध्द आरंभलेल्या मोहिमेत सातत्यपुर्ण कार्यवाही केल्याने जनतेत सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम